# तिची खंत

मनी किती फुटले धुमारे
उचंबळती विचारांच्या लाटा ओठावरती ।
पण, शब्दच न फुटती
परतूनी लावी मग प्रत्येक प्रसंगावरती ॥

वाटे कधी स्वैर सुटावे
गीत गुणगुणत पाखरांसवे बागडावे ।
पण पाहिलेल्या स्वप्नपूर्तीचे
कोडे कधी न उलगडावे ॥

स्वप्नी रंगावे हिंदोळ्यावरती
झुलत रहावे त्याच्या आधाराने ।
पण, आयुष्यभराच्या सप्तपदीचे
सुटता पाश, जगणे शिकावे निर्धाराने ॥

सुरेल विणल्या प्रेमाच्या गाठी
नाव दिले त्यास रेशीमगाठी ।
पण, एकेक गाठीचे बंध
सुटत - सुटत उरले ना त्याच्यासाठी ॥

आतल्या धगधगत्या निखाऱ्याची
धग जाणवेल कुणा ।
माझ्या मनीची खंत कधीतरी
जाणवेल ना कधी कुणा ॥



सौ. अस्मिता झा. बालेकर
'वंदेमातरम' नवाथेनगर.